**पोलीस आयुक्तालय नवी मुंबई**

**प्रेसनोट**

**2025**

**CB/23/2025**

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** **दिनांक १५.०४.२०२५**

**'' अल्पवयीन मुलीचे खुनाचे गुन्हयाचा तुर्भे पोलीस ठाणे व गुन्हे शाखा, नवी मुंबई पोलीसांनी कौशल्यपूर्वक तपास करुन २४ तासाचे आत गुन्हा उघडकीस आणलेबाबत.''**

---

दिनांक २५/०४/२०२५ रोजी तुर्भे पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये शिरवणे एम.आय.डी.सी. नवी मुंबई येथील फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी घराबाहेर मैत्रीणी सोबत खेळत असतांना अज्ञात इसमाने तिला कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेल्याबाबत अज्ञात इसमाविरुध्द तुर्भे पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक २००/२०२५, बी.एन.एस. कलम १३७(२) (भा.द.वि. ३६३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा व महीलाविरुध्दचा असल्याने तो तात्काळ उघडकीस आणण्याबाबत श्री.मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, श्री.संजय येनपुरे, पोलीस सह आयुक्त, श्री. दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.अमित काळे, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -१ वाशी, नवी मुंबई यांनी आदेशित केले होते.

त्यानुसार तुर्भे पोलीस ठाणे व गुन्हे शाखा, नवी मुंबई कडील पाच पथके तयार करण्यात आली होती. सदर अल्पवयीन मुलीचा तिचे नातेवाईक व शेजा-यांनी राहत असलेल्या परिसरात तिचा शोध घेत असतांना, रात्रौ ११-१५ वा. चे सुमारास डोंगराच्या पायथ्याशी ती जखमी अवस्थेत मिळुन आल्याने तिच्या नातेवाईकांनी तिला डी.वाय. पाटील हॉस्पीटल, नेरुळ येथे उपचाराकरीता नेले असता, डॉक्टरांनी तिला मयत घोषीत केले.सदर गुन्हयामध्ये खुनाबाबत बी.एन.एस. १०३(१) (भा.द.वि. कलम ३०२) हे कलम वाढ करण्यात आले.

सदर घटनास्थळ परिसरातील संशयीतांकडे कौशल्यपुर्वक चौकशी व तांत्रीक पध्दतीने गुन्हयाचा तपास करण्यात आला. गुन्हयातील पिडीत अल्पवयीन मुलीस त्या परिसरात राहणारे एका १७ वर्षे वयाचे विधीसंघर्षग्रस्थ बालकाने तिला घेवून गेल्याच आढळुन आले. विधीसंघर्षग्रस्थ बालकास पथकातील महिला पोलीस अमंलदार यांच्या मदतीने विश्वासात घेवून त्याच्याकडे तपास केला असता, त्याने गुन्हयातील पिडीत अल्पवयीन मुलीस तिचे राहते परिसराच्या मागील डोंगराचे पायथ्यालगचे निर्जनस्थळी झाडामध्ये सेल्फी काढण्याचे कारण सांगुन नेले. पिडीत अल्पवयीन मुलीसोबतचे जुन्या भांडणाचा मनात राग धरून, तिला शिवीगाळी व मारहाण केली. त्यास पिडीत अल्पवयीन मुलीने प्रतिकार केल्याने, विधीसंघर्षग्रस्थ बालकाने पिडीत अल्पवयीन मुलीचे चेह-यावर दगड मारूण तिचा खुन केल्याची स्वखुशीने कबुली दिली आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या विधीसंघर्षग्रस्थ बालक शिरवणे एम.आय.डी.सी. तुर्भे नवी मुंबई येथील राहणारे बालकास ताब्यात घेण्यात आले असून, त्याचेकडे चौकशी करून पुढील कायदेशीर कारवाई करून मा.बाल न्याय मंडळा समक्ष हजर करीत आहोत.

सदरची यशस्वी कामगिरी मयुर भुजबळ, सहा.पोलीस आयुक्त, तुर्भे विभाग, अजयकुमार लांडगे सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली आबासाहेब पाटील, वपोनि, तुर्भे पोलीस ठाणे, सुनिल शिंदे, वपोनि, मध्यवर्ती कक्ष, निरज चौधरी, वपोनि, कक्ष-१ वाशी, उमेश गवळी, वपोनि, कक्ष-२ पनवेल, हनिफ मुलानी, वपोनि, कक्ष-३, कळंबोली, नवी मुंबई व पथकाच्या मदतीने सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याची कामगिरी केलेली आहे.

★★★★★★★★★★